
# अमृत कुंभ



**महाशिवरात्री विशेषांक**

वर्ष १६ | अंक ६ | फेब्रुवारी -मार्च २२ | मूल्य रु. १३/-



## परमेश्वर एकच आहे

अनेक जण म्हणतात देव एकच आहे.  त्याला मनोभावे नमस्कार केला किंवा त्याची आठवण केली तर, तो भक्ती-भाव त्याला जाऊन पोहोचतो असे मानतात. जगात अनेक धर्म, पंथ आहेत, अनेक उपासना पद्धती आहेत.

परमेश्वराविषयी सर्वमान्य संकल्पना आहे - तो निराकार आहे, सर्वोच्च आहे, सर्वज्ञ आहे, जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त आहे, त्याला स्वतःचा देहाकार नाही. असा निराकार शिव पिता स्वतः येऊन आपले दिव्य ज्ञान देत आहे. ज्या साकार शरीराचा आधार घेऊन शिव आपले ज्ञान प्रकट करतात त्यास 'प्रजापिता ब्रह्मा म्हटले जाते.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १६, अंक ६. फेब्रुवारी – मार्च २०२३


| | | |
|---|---|---|
| १. | एक अद्वितीय विश्व विद्यालय | २ |
| २. | विशेषांकाच्या निमित्ताने मनोगत | ३ |
| ३. | संपादकीय – महाशिवरात्र आणि वसुधैव कुटुंबकम् | ४ |
| ४. | शिवपूजा आणि इतिहासकालीन संदर्भ | ६ |
| ५. | शिव मंदिरातील प्रथांचा आध्यात्मिक अर्थ | ८ |
| ६. | बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक रहस्य | ९ |
| ७. | शिवरात्रीचे रहस्य | ११ |
| ८. | शिवरात्र सर्वात मोठा सण | १३ |
| ९. | शिवरात्र – गीताजयंती अन्योन्य संबंध | १५ |


## मुखपृष्ठाविषयी

'जीव किंवा मनुष्यात्मा स्वाभाविकपणे बद्ध आहे आणि त्याला मुक्तीची आस लागली आहे' असे अध्यात्मात मानले जाते. मुक्तता-अनेक गोष्टींपासून! जुन्या सवयी, पूर्वग्रह, नको त्या आठवणी आणि बरंच काही. जीवनातल्या समस्यांमुळे कधी कधी भरून आलेल्या आभाळाप्रमाणे आपले मन काळवंडते. दुःखाचे मूळ आहे स्वतःला देह समजण्याच्या सवयीमध्ये; पण त्या दुःखाचा समूळ नाश कसा करायचा ते उमगत नाही.

कलियुगाच्या अंती परमात्मा शिव स्वतः अवतरित होतात आणि दिव्य ज्ञान देतात. ज्ञान म्हणजेच प्रकाश. परमात्म्याच्या ज्ञानामुळे जीवनात नव्या आशा पल्लवित होतात. मनाची कवाडे उघडतात आणि सुखी जीवनाची वाटचाल सुरू होते. कलियुगरूपी रात्रीत दुःखहर्ता - सुखकर्ता शिवाचे आगमन होते याचे प्रतीक म्हणून 'शिवरात्र' साजरी केली जाते. अज्ञानरूपी रात्रीचे दिवसात रूपांतर करण्यासाठी शिवाचे अवतरण झाले आहे. निराकार शिव हा सर्व मनुष्यात्म्यांचा पिता आहे. त्याची आठवण करणे म्हणजेच 'राजयोग'. या योगाच्या आधारे शक्ती प्राप्त होते आणि अनेक सूक्ष्म बंधनापासून मुक्ती साध्य होते. आपल्या दिव्य गीता ज्ञानाद्वारे जीवन परिवर्तनाची शिकवण साक्षात शिव देत आहेत, हाच संदेश मुखपृष्ठातील चित्राद्वारे अभिप्रेत आहे. – प्रकाशिका

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.

# एक अद्वितीय विश्व विद्यालय

मूल्यनिष्ठ आध्यात्मिक शिक्षण प्रदान करणारी आंतरराष्ट्रीय पातळीवरची एकमेवाद्वितीय संस्था-प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय. या संस्थेच्या आठ हजाराहून अधिक शाखा आहेत. आबू पर्वतावर वसलेल्या मुख्यालयाद्वारे हे आध्यात्मिक विश्व विद्यालय आज एकशे चाळीस देशात कार्यरत आहे. संस्थेचे संचालन माता-भगिनींद्वारे होते. स्त्रियांद्वारे सर्व प्रशासन सांभाळले जाणारी इतक्या व्यापक प्रमाणावर कार्य करणारी ही संस्था जगात एकमेकाद्वितीय असावी. तीस हजारापेक्षा जास्त भगिनींनी आपले जीवन संस्थेच्या कार्यास वाहून घेतले आहे. माता भगिनींच्या नेतृत्वाचे प्रत्यक्ष दर्शन १९३७ पासूनच घडले. शिवपित्याने 'दादा लेखराज' यांचे तनात अवतरित होऊन आपले ज्ञान प्रकट केले. पुढे दादांना कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' प्राप्त झाले. ब्रह्माबाबांनी आपली सर्व संपत्ती माता-भगिनींच्या विश्वस्त मंडळाकडे सोपविली. मंडळाचे त्याकाळी नाव सर्वश्रुत झाले - 'ॐ मंडळी'. त्याचे नेतृत्व 'मातेश्वरी जगदंबा' यांनी केले. १८ जाने. १९६९ रोजी ब्रह्माबाबांनी देह त्यागल्यावर तिथून पुढे २००७ पर्यंत दादी प्रकाशमणींनी नेतृत्वाची जबाबदारी पेलली. त्यांच्या खांद्याला खांदा लावून दादी जानकीजींनी संस्थेचा कार्यभार परदेशातील काना-कोपऱ्यात पोहोचविला. राज्यकर्ते, भारत सरकार आणि अनेक गणमान्य व्यक्तींपर्यंत ईश्वरी संदेश पोहोचविण्यात दादी गुलजारजींचे योगदान अतुलनीय होते. अशा सर्वच मंडळींची मांदियाळी मोठी आहे.

व्यक्तिगत जीवन परिवर्तनासाठी आध्यात्मिक शिक्षण आणि राजयोगाचे प्रशिक्षण संस्थेच्या विविध शाखांमार्फत दिले जाते. युवा प्रभाग, धार्मिक प्रभाग, समाजसेवा प्रभाग इत्यादी २० प्रभागांद्वारे संस्था, समाजातील विविध स्तरातील लोकांमध्ये आध्यात्मिक जागृती आणण्याचे कार्य करत आहे. ही अशासकीय संस्था असली तरी, संस्थेला संयुक्त राष्ट्रसंघात सल्लागार या नात्याने दोन जागा प्राप्त आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनसंपर्क विभागाशी संलग्न राहून संस्था आपले योगदान देत आहे.



दादी प्रकाशमणी, दादी गुलजार, दादी जानकी

स्थानिक पातळीवर विद्यालयांमध्ये मूल्यनिष्ठ शिक्षणाची पायाभरणी करणे, अनेक कारागृहातील बंदी बांधवांच्या मनोवृत्तीत राजयोगाच्या शिक्षणाद्वारे परिवर्तन आणण्यात हातभार लावणे, व्यसन मुक्तीसाठी जागरुकता आणणे असे अनेक कार्यक्रम संस्था राबवते. अनेक कुटुंबे आपली दैनंदिन कामे सांभाळून राजयोगाची साधना करत आहेत, जीवनोन्नती साधत आहेत. संस्थेत कुठल्याही जाती-धर्माचे, उच्च-नीच असे भेदभाव न बाळगता सर्वांना समान ज्ञान दिले जाते. सात दिवसांच्या प्राथमिक अभ्यासक्रमाद्वारे संस्थेच्या पायाभूत शिकवणुकीची तोंडओळख करवून दिली जाते. संपूर्ण शिक्षण निःशुल्क दिले जाते. नवागतांना सस्नेह निमंत्रण सदैव आहे. या आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ घेऊन आपले जीवनमान सुधारा हीच आग्रहाची विनंती.

***



# विशेषांकाच्या निमित्ताने मनोगत

गेल्या संपूर्ण शतकाच्या कालखंडावर नजर फिरवली तर एकच महत्त्वाची घटना डोळ्यासमोर येते ती म्हणजे शिवपित्याचे या सृष्टीवर झालेले अवतरण. जन्मोजन्मी ईश्वराची आळवणी केली, ईश्वर प्राप्ती व्हावी म्हणून किती प्रकारची साधना, व्रत-वैकल्ये केली. त्या सगळ्याचे फलित म्हणून की काय १९३७ साली परमात्मा शिव स्वतः अवतरित झाले. ब्रह्माबाबांच्या देहाचा आधार घेऊन त्यांनी आपले ज्ञान प्रकट करण्यास सुरवात केली. तेव्हापासून आजपर्यंत मागील ८६ वर्षात ज्ञानसागराने विपुल ज्ञानभांडार खुले केले. सगळ्या ज्ञानाचे सार सांगायचे झाले, तर आपल्या स्वभाव आणि संस्कारात परिवर्तन. ज्ञानसंपन्नतेसोबत शक्तिसंपन्न बनणे अपेक्षित आहे. 'कामक्रोधवियुक्तानां यतींनां' या वचनाप्रमाणे आपण सर्वांनी विकारांच्या सूक्ष्म बंधनांपासून मुक्त स्थिती गाठणे अपेक्षित आहे. राजयोगाच्या नियमित साधकांकडून अर्थात सर्वसंग परित्यागी संन्याशांकडून ही स्थिती अपेक्षित आहे. कुठल्याही रूपात मायेची प्रलोभने मन-बुद्धीस प्रभावित करता कामा नयेत. त्यासाठी एकांतप्रिय आणि एकाग्रतेची साधना अधिक उग्र करायला हवी.

प्रत्यक्षात शिवपिता येऊन ज्ञान देत आहे हे ब्रह्माकुमारीजच्या नियमित विद्यार्थ्यांनी जाणले आहे. जो तो आपापल्या परीने ते ज्ञान धारणही करत आहे. आपण अनुभव घेत आहोत आपल्या हृदयात ईशप्रेम घर करून आहे; पण तो स्थूल रूपात व्यापक नाही. परमात्म्याने दिलेले गीताज्ञान आणि ज्ञानदाता दोन्ही आपल्या आचरणातून प्रत्यक्ष होण्याची वेळ समीप येऊन ठेपली आहे. सृष्टीपरिवर्तनाची घटिका डोळ्यासमोर आहे. जशी संतश्रेष्ठ मीराबाईंची ओढ होती, 'ऐसी लागी लगन, मीरा हो गयी मगन' त्याप्रमाणे आता एकच निराकार परमेश्वर बुद्धीरूपी नेत्रांसमोर कायम हवा, मन निर्विघ्न हवे.

'जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्यासी सांगावे' या न्यायानुसार शिवपित्याचे सत्य ज्ञान नियमितपणे श्रवण आणि धारण करणाऱ्यांवर ही एक नैतिक आणि आध्यात्मिक जबाबदारीही आहे.. हे ज्ञान सर्वदूर पसरविणे हे आपले आध्यात्मिक कर्तव्य आहे. जगातील प्रत्येक मनुष्यात्मा परमेश्वराचे मूल आहे. शिवअवतरणाची शुभवार्ता प्रत्येकापर्यंत पोहोचवली पाहिजे. या एकाच उद्देशाने प्रेरित होऊन हा 'शिवरात्री विशेषांक' आपल्या हाती ठेवत आहोत. आशा आहे, सर्वांना याद्वारे लाभ व्हावा, सत्य ईश्वर परिचय मिळावा.

महाशिवरात्रीच्या मंगल उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला शुभेच्छा !

**ब्र.कु. गोदावरी,**
प्रकाशिका, अमृतकुंभ,
मुलुंड सब-झोन

## बहुगुणी बेल आणि शिवपूजा

बेलपत्रांचा वापर शिवपूजेत केला जातो हे आपल्याला माहीतच आहे. तसेच बेलफळांचा आणि पाने व खोडाचा गाभा यांचाही वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो. बेलफळाचा मुरंबा, सरबत, हे आवेवरचे रुचकर औषध, भूक वाढणारे टॉनिक आहे. बेलाचे फळ पोटाच्या विकारावर फार औषधी आहे. फळाचा मुरंबा करतात.

जसे शरीरातील त्याज्य गोष्टींचा निचरा करण्यात बेल मदत करतो तसेच शिव परमात्मा आत्म्यातील त्याज्य दुर्गुणांपासून मुक्तता देतात. हाच पूजेतील वस्तू वाहण्याचा खरा अर्थ मनाला पटतो. त्रिदल वर्गातील बेलाची पाने (प्रत्येक देठाला तीन पाने) त्याला वाहिली जातात. कुणी असंही म्हणतात, शिव हा त्रिगुणातीत आहे म्हणजेच त्याला सत्त्व, रज आणि तम या गुणांची बंधनेही बांधू शकत नाहीत, तो सदैव पतित-पावन आहे म्हणून त्याला बिल्वपत्र वाहण्याची प्रथा आहे. एकूणात काय तर सर्वोच्च शक्तीविषयी भक्तिभाव व्यक्त करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बेलाचे महत्त्वही स्थूल आणि सूक्ष्म रूपात काही उणे नाही.

**ब्र.कु. डॉ. ज्योत्स्ना, ठाणे**

संपादकीय ...

# महाशिवरात्र आणि वसुधैव कुटुंबकम्

अनेक ठिकाणी शिवमंदिरे थोडीशी अंतर्मुख करणारी आणि गूढ भासतात. गर्भगृह किंवा गाभाऱ्यात उतरून जाताना लागणाऱ्या पायऱ्या, आतमध्ये तेवणारा दिवा आणि सगळं वातावरणच वेगळं भासतं. अन्य देव-देवतांच्या गाभाऱ्याला बाहेरून पूर्ण प्रदक्षिणा घालतात; पण शिवलिंगाला मात्र तसं नाही करत. शिवलिंगाच्या पन्हळीपर्यंत येऊन मागे परतायचे, ओलांडायचे नाही. देव-देवतांना सुगंधी फुलं अर्पण करतात. पण शिवलिंगाला धोतऱ्याचे विषारी फूल वाहतात. शिव आणि शिवलिंग म्हटलं की सगळंच वेगळ्या रुढीचं असतं आणि शिवाचे व्रतही कडक मानले जाते.

कौटिल्याने अर्थशास्त्रावर विपुल लिखाण केले आणि त्यात दुर्ग म्हणजे किल्ल्यांबाबत एक दीर्घ प्रकरणच आहे. त्यात दुर्गांवर शिवमंदिर असावं असा उल्लेख सापडतो. 'लिंग' शब्द शारीरिक पातळीवर असलेल्या स्त्रीलिंग, पुल्लिंगाशी संबंधित नसून त्याचा अर्थ 'चिन्ह' असाच आहे. याला अनेक संदर्भ सापडतात. वेदान्त सूत्रांत बारापेक्षा अधिक वेळा लिंग म्हणजे चिन्ह या अर्थी शब्द येतो, ब्रह्मसूत्रातही तसेच उल्लेख सापडतात. 'न्याय दर्शन' नावाच्या ग्रंथात म्हटले गेले आहे, 'एकाच वेळी अनेक वस्तुंचे ज्ञान न होणे हे मनाचे लिंग अर्थात चिन्ह आहे.' काही अभ्यासकांच्या मते 'ली' म्हणजे अव्यक्त किंवा निराकार आणि गम (गमक) म्हणजे चिन्ह होय. शिव म्हणजे कल्याणकारी आणि शिवाला परमात्मा म्हटले आहे. शिव निराकार आहे आणि निराकाराविषयी आपला भक्तिभाव प्रकट करण्याचे व्यक्त रूप म्हणजे शिवलिंग. परमात्मा किंवा परमेश्वर कुणाला म्हणायचे? त्याचे सत्य रूप काय? कुणी रामाला ईश्वर मानतो कुणी कृष्णाला, कुणी निसर्ग म्हणजेच परमेश्वर समजतो.

**नक्की ईश्वर कुणाला म्हणायचे यासाठी खालील निकष विचारात घेऊया.**

**१) जो सर्वमान्य म्हणजे सर्वांना मान्य आहे अशी सत्ता किंवा शक्ती म्हणजे ईश्वर किंवा परमात्मा.**

**२) जो सर्वोच्च, सर्वोत्तम, सर्व श्रेष्ठ आहे तो परमेश्वर.**

**३) जो अलिप्त (न्यारा) आहे, कशापासून? जन्म-मरणापासून, कर्मफळापासून, सुख-दुःखापासून इ.**

**४) जो सर्वज्ञ आहे अर्थात् ज्ञानसागर आहे.**

**५) जो गुण व शक्तींचा अक्षय सागर आहे.**

**६) जो स्वयंभू आहे म्हणजेच जो स्वतः उत्पन्न झालेला आहे किंवा अनादि आहे; त्याचा कुणी मात-पिता नाही असा सर्वशक्तिवान.**

या निकषांवर मनन केल्यास जाणवते-परमेश्वराविषयी 'निराकार' ही एकच कल्पना ग्राह्य वाटते. ज्याला देह आहे त्याला जन्म आणि मृत्यू, कर्म आणि कर्मफल बाध्य करते. ज्याला कर्म आणि कर्मफल बाध्य करते त्याला सत्व, रज, तम अवस्थांतून जावे लागते. म्हणजेच कुठलाही देवात्मा, महात्मा, धर्मात्मा या निकषांवर पूर्णपणे तोलता येत नाही. अनेक धर्मात, पंथात परमेश्वराला निराकारच संबोधले आहे. इस्लाममध्ये म्हटले आहे 'अल्लाह नूरका (प्रकाशाचा) पुतला है म्हणजे प्रकाश आहे'. येशूने म्हटले आहे - गॉड इज लाइट म्हणजे परमेश्वराचे रूप प्रकाशमय आहे किंवा तो प्रकाशस्वरूप आहे. शीख पंथात 'एक ॐकार' म्हटले आहे. भारतात बारा ज्योतिर्लिंगे प्रसिद्ध आहेतच; पण प्रत्येक गावात एक तरी शिवमंदिर आढळते. इतिहासकालीन दाखले चाळले तर राजा विक्रमादित्यापासून, महाराणा प्रताप, शिवाजी महाराज, महाकवी कालिदास, गानसम्राट तानसेन अशी अनेक शिवभक्तांची उदाहरणे सापडतात.

भारत देशाबाहेरही असंख्य संदर्भ सापडतात. जगातल्या अनेक देशांत शिवलिंगाचे किंवा निराकाराचे प्रतीक म्हणून शिवलिंग स्थापल्याचे उल्लेख सापडतात. भाषा वेगवेगळ्या आहेत; पण त्यामागचा भाव तोच आहे, गर्भितार्थही तोच आहे.

श्रीलंका, मॉरीशस, म्यानमार, थायलंड, इटली, ऑस्ट्रीया, हंगेरी, सायबेरिया अशा अनेक ठिकाणी शिवलिंगाकाराचे अवशेष किंवा संदर्भ सापडतात. (आधारः

'पृथ्वी प्रदक्षिणा', ज्ञान मण्डल काशी आणि गीता प्रेस गोरखपूर द्वारा प्रकाशित विशेषांक)

जगभरातल्या अनेकानेक संस्कृतींवर शिव उपासनेचा प्रभाव होता हे दिसून येते. आपापल्या भाषेत त्या काळात निराकार शिव या संकल्पनेचा स्वीकार केल्याचे आढळते.

**तात्पर्य : परमेश्वर निराकार आहे आणि त्याच्याविषयी भाव प्रकट करण्याचे स्थूल माध्यम म्हणून ज्योतीच्या किंवा अंगुष्ठाकाराच्या आकाराची शिवप्रतिमा निर्माण केली गेली. तिचे गायन पूजन आपापल्या पद्धतीने जो तो आपापल्या प्रांतात करत असे.**

भाषेच्या आधारे शोधू पाहता असेच आश्चर्यजनक संदर्भ हाती येतात. हजरत मुहम्मद पैगंबरसाहेबांचे काका 'उमर बिन हश्याम' नावाचे प्रसिद्ध ईश्वरभक्त होते. त्यांचे एक अरबी भाषेतील काव्य 'से अरुल ओकुल' नावाच्या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झाले आहे. त्यातील २३५ व्या पृष्ठावर प्रकाशित काव्यातील एकच कडवं येथे देत आहोत.

व अहालोलहा अजहू अरामीमन महादेव ओ।
मनोजेल इलमुद्दीने मीनहुम व सयत्तरु

याचा अर्थ - जर खऱ्या अंतःकरणाने कुणी महादेवाची पूजा करेल त्याला अध्यात्ममार्गात सर्वोच्च पद प्राप्त करता येईल. येथे 'महादेव' शब्दाचा भारतातील प्रचलित अर्थच अभिप्रेत आहे.

आता सुरूवातीच्या पाच-सहा निकषांकडे दृष्टी टाकल्यास जाणवेल की सर्वमान्य अशी जगभरातील निराकाराची संकल्पना परमात्मा शिवालाच लागू होते.

असा हा निराकार शिव जेव्हा धरतीवर दिव्य रीतीने अवतरित होतो तेव्हा रात्र असते. त्या रात्रीचे गायन, पूजन शिवरात्रीच्या रूपात होते. दिनदर्शिकेत किंवा पंचांगात 'प्रदोष' असा एक शब्द येतो. दर महिन्यातील कृष्णपक्ष आणि शुक्ल पक्षातील त्रयोदशीला प्रदोष म्हटले जाते. त्यादिवशी सूर्यास्ताच्या दीड तास आधी आणि नंतर दीड तास या कालावधीत शिवोपासना केल्यास विशेष फलप्राप्ती होते असे मानतात. शनिवारी त्रयोदशी आल्यास शनिप्रदोष, सोमवारी आल्यास सोमप्रदोष अशी नावे दिली जातात. असुरांच्या जाचातून सुटका व्हावी म्हणून देवांनी शिवास साकडे घातले. मग असुरांचा पराजय शिवाच्या कृपाप्रसादामुळे झाला अशा कथाही पहायला मिळतात. त्यानिमित्ताने प्रत्येक महिन्यात दोनदा शिवपूजा करावी असा संकेत आहे. माघ महिन्यात कृष्ण पक्षात येणाऱ्या त्रयोदशीला 'महाशिवरात्र' साजरी करतात. म्हणजे अमावस्येच्या दोन दिवस आधी येणारी तिथी. आता थोडा व्यापक विचार करून पाहू या. प्रत्येक महिन्यातल्या प्रदोषाला सूर्यास्ता दरम्यान पूजा करणे म्हणजे दिवस आणि रात्रीचा संधिकाळ. हे महिना आणि वर्ष याच्याशी निगडीत नसून त्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर लागू होणाऱ्या कालखण्डाशी जोडलेले आहे. येथे युगपरिवर्तनाचा संदर्भ आहे. मात्र आध्यात्मिक पातळीवर विचार केल्यास जाणवते, चोवीस तासातल्या दिवस-रात्रीतील ही रात्र नसावी. खऱ्या अर्थाने कलियुग, अज्ञान (ईश्वराविषयीचे अज्ञान) रूपी रात्र आहे. इस्लाममध्ये यालाच समांतर म्हणता येईल अशी 'शबेरात' आहे. काही ठिकाणी त्याचा उल्लेख 'शब-ए-बारात' असाही सापडतो. 'शब' म्हणजे रात्र आणि ही रात्र 'बेहद फजीलत' म्हणजे अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. असे म्हणतात की या दिवशी किंबहुना रात्री म्हणूया, 'इबादत' म्हणजे ईश आराधना करून आपल्या दुष्कृत्यांची माफी मागितल्यास त्याचे अवश्य काही पट अधिक फळ मिळते. अनेक जण या दिवशी दानधर्म करतात. पवित्र ग्रंथ कुराणाचे पठणही करतात. याचा परिपाक विशेष पुण्यप्राप्तीत होतो असे मानले जाते. सर्वमान्य असणारी ही सर्वोच्च सत्ता अवतरित होऊन आपला परिचय देते. शिव परमात्मा म्हणतात, भक्तिमार्गात भावनेपोटी भक्तांनी मला अनेक नावांनी संबोधले. ती सर्व नावे गुणवाचक किंवा कर्तव्यवाचक आहेत. उदा. निरहंकार, अनघ किंवा पतित पावन इत्यादी. पण मूळ नाव शिव म्हणजे कल्याणकारी हेच आहे.

ईश्वराचे मूळ रूप निराकार ज्योतिर्बिंदू आहे. निराकार अर्थात् जो सदैव देहरहित आहे आणि दिव्य प्रकाशमय आहे. शिव स्वयंभू आहेत. जिथे सूर्य-चंद्र, तारे इत्यादींचा प्रकाशही पोहोचत नाही असे परमधाम हे शिवाचे निवासस्थान आहे. (न तद् भासयते सूर्यो...) मानवाच्या उत्थानासाठी किंवा पतितांना पावन करण्यासाठी शिवाला परकाया प्रवेश करून स्वयं परिचय द्यावा लागतो. भक्तिमार्गात म्हटले गेले यो मां पश्यति सर्वत्र... त्यामागे भक्तांच्या मनाची उत्कट प्रेमभावना होती, जिथे पाहेन तिथे मला तूच दिसतोस. प्रेमविभोर अवस्थेतून निघालेले उद्‌गार

(पृष्ठ क्र.१२ वर)

# शिवपूजा आणि इतिहासकालीन संदर्भ

ब्र.कु. रामकृष्ण, वाशिम

इतिहासाचे किंवा प्राचीन ग्रंथांचे परिशीलन केल्यास आढळते – परमापिता परमात्मा शिवाविषयीचा श्रद्धाभाव पूर्वापार चालत आला आहे. देशोदेशीच्या सीमा पार करून शिवोपासना सर्वदूर पसरली होती हे दिसून येते. त्यात भाषेची, संस्कृतीची बंधने आड आली नाहीत असेही लक्षात येते.

**शिवोपासना – देशोदेशींचे संदर्भ**

जगात अनेक देशात शिवलिंग किंवा त्याचे अवशेष सापडले आहेत. याचाच अर्थ इतिहासकाळात कधी ना कधी त्या प्रांतात देखील शिवोपासना केली जात असे.

- आफ्रिकेतल्या चित्राल, स्वात, बुखारा इत्यादी स्थानी 'चंचेशर' या नावाने शिवप्रतिमा पूजली जायची.
- हवाई बेटांवरील आदिवासी निसर्गाचा कोप शमविण्यासाठी तशी मनोकामना बाळगून शिवाची आराधना करीत असल्याचे उल्लेख सापडतात.
- दक्षिण अमेरिकेतील ब्राझील देशात शिवलिंगाचे भग्नावशेष सापडल्याचे उल्लेख आढळतात.
- स्कॉटलंड देशातील ग्लासगो शहरात सुवर्णजडित मोठे शिवलिंग होते असाही संदर्भ मिळतो.
- म्यानमार, थायलंड येथेही शिवलिंगाच्या रुपात ईश्वराची आराधना केली जाई. तिथे त्या प्रतिमेला 'एकोनिस किंवा ऐस्टरगॅरीस' असे नाव होते.
- श्रीलंकेत बौद्ध धर्माचा अधिक पगडा आहे. तरी तेथील इतिहासकालीन संदर्भात शिवउपासनेचे धागे-दोरे सापडतात. त्याचप्रमाणे मॉरीशसमध्येही असेच संदर्भ मिळतात.
- ज्यू धर्माचे प्रमुख स्थान असणाऱ्या इस्रायलमध्ये शिवलिंगासमान असणाऱ्या प्रतिमेस 'बेलफेगो' म्हणत असत असा एक उल्लेख आहे.
- पिरॅमिडसाठी प्रसिद्ध असणाऱ्या इजिप्तमध्ये 'आइसिस किंवा ओसिरिस' नावाने शिवप्रतिमा पूजली जायची.
- चीनमध्ये शिवप्रतिमेस 'हुवेड हिफुहं' असे म्हटले जात होते.
- ग्रीस या देशाला तेथील स्थानिक भाषेत लोकं 'एल्लास' म्हणतात. तिथे 'फल्लूस' या नावाने शिवलिंग प्रसिद्ध होते.
- 'आईझू' नावाचे जपानमधील एक प्राचीन शहर आहे. येथे जुन्या संस्कृतीचे अनेक अवशेष सापडले आहेत. त्यात शिवलिंगाचे अवशेष सापडल्याचेही उल्लेख आढळतात.

प्राचीन कथा आणि साहित्यात एक रंजक कथा पहायला मिळते. ती अशी – सृष्टीचा महाविनाश झाला, सर्वत्र जलमय परिस्थिती झाली. 'नोहाची नौका' या नावाने अशाच अर्थाची गोष्ट अन्य धर्म-पंथातही आढळते. जलमय सृष्टीवर एके दिवशी अचानक एक अण्डाकार प्रकाश अवतरित झाला. या प्रकाशाचा उगम शोधण्याची प्रबळ इच्छा ब्रह्मदेवांना झाली कारण त्यांना अपरिचित अशी ती घटना होती. पाण्यात फार खोलवर जाऊनही त्यांना त्या प्रकाशाचा ठाव लागेना म्हणून शेवटी त्यांनी प्रार्थना केली, 'हे दिव्य प्रकाशा तुझा परिचय काय?' दिव्य प्रकाशाने बोध केला, 'मी सृष्टीचा बीजरूप आहे, मूळ आहे, शिव आहे. अशाच प्रकारची अजून एक कथा पाहण्यात येते. उत्पत्ती, स्थिती आणि लय या निसर्गक्रमातील स्वाभाविक गती आहेत किंवा मुलभूत गोष्टी आहेत. या तीन कार्यांसाठी ब्रह्मा, विष्णू आणि शंकर या तीन देवता निमित्त आहेत असेही मानले जाते. एकदा या तीनही देवता आपापले कार्य थांबवून सुट्टी घ्यायचे ठरवितात किंवा संपावर जातात असे समजा हवे असल्यास. त्या तिघांना कुतूहल असते, आता सृष्टीचे काय होणार? सगळं काही ठप्प! पण त्यांना एक कुंभार गाढवावर काही मडकी लादून चालल्याचे दिसते. त्रिमूर्ती देवता कुंभाराला विचारतात, 'मडक्यात काय आहे?' कुंभार म्हणतो, 'तुम्हीच पहा.' पाहतात तर त्यात तीन बाळे, ब्रह्मा, विष्णू, शंकर असतात. दुसऱ्या, तिसऱ्या सगळ्या मडक्यातून तेच दृश्य पहायला मिळते. मग तीनही देवता म्हणतात, 'आपण कोण?' तेव्हा कुंभार आपले खरे रूप प्रकट करतो आणि सांगतो, 'मीच तुमचा निर्माता आहे.'

हे ऐकल्यावर तीनही देवतांचा भ्रम, अहंकार गळून जातो. समर्थ रामदासांच्या एका ओवीचा येथे संदर्भ देता येईल.

ब्रह्मा विष्णू आणि हर। हे जयाचे अवतार।
तोचि देव हा निर्धार। निश्चयेंसी।। (दासबोध ८/१/२१)

शिव हाच भाषेचा उद्‌गाता आहे असे भाषाशास्त्रकारांपैकी काहींचे मत आहे. अगम-निगम म्हणजे जन्म-मरणाचा येरझार काय आहे त्याचा रहस्यभेदही शिवच करतो असे मानले गेले आहे.

यहुदी किंवा ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मांशी संबंधित 'जुना करार' (Old Testament) ग्रंथातही ईश्वराला उद्देशून 'जेहोवा किंवा येहोवा' म्हटले आहे. 'शिव किंवा शिवा' या शब्दाचेच बदलत गेलेले एक रूप म्हणजे येहोवा. भाषेत अशी अनेक स्थित्यंतरे कालपरत्वे आणि स्थानपरत्वे होत जातात. उदा. संस्कृतात आठवड्याला 'सप्ताह' म्हणतात. त्याचे फारसी किंवा अरबीत हफ्ता झाले. 'स'च्या जागी 'ह' वापरला गेला. अनेकजण पाण्याच्या नळात असलेल्या 'वॉशर'ला वायसर म्हणतात तसेच शिवाचे येहोवा झाले असावे.

संस्कृतातल्या पितृ शब्दाचे फारसीत पिदर आणि युरोपीय भाषांत फादर होते त्याप्रमाणे निराकार शिवाच्या नावात बदल होत गेले.

मनुस्मृतीत एक संदर्भ आढळतो. सृष्टीच्या आरंभी एक तेजस्वी आणि कांतिमान अंडाकार ज्योत प्रकट झाली.

तदण्मभवद्वैमं सहस्रांशुसमप्रभम् (मनु.१/९)

शिव पुराणात उल्लेख आढळतो, सृष्टी विनाशकाळी एक अद्‌भुत ज्योतिर्लिंग प्रकट झाले, ते वाढतही नव्हते, घटतही नव्हते, स्थिर होते, प्रकाशमान होते, अव्यक्त होते. त्यातून नवसृष्टीची निर्मिती झाली.

काही लोक यजुर्वेदातील ऋचांचा अर्थ करतात की सृष्टीरचनेसाठी विद्युत पुरुष (ज्योतिर्लिंगम्) प्रकट झाले.

सवनिमेषा जशिरे विद्युतः पुरुषादधि।
नैनमूर्ध्वम् न तिर्यञ्च न मध्ये परिजग्रमात्।। (यजुर्वेद ३ ३/२)

सत्ययुग आणि त्रेतायुगात मानव दिव्य गुणधारी अवस्थेत होता. त्यास देवत्व प्राप्त झाले होते. पवित्रता, सुख-शांती अशा गुणांची पराकाष्ठा होती. हळूहळू जन्म मृत्यूच्या चक्राने गुणांमध्ये घट आली, देहाभिमान आला आणि कल्पार्धानंतर मानव पतनोन्मुख झाला. दुःखामुळे भक्तीची आवश्यकता निर्माण झाली. त्याकाळी निराकाराचीच पूजा होत असे. स्कंदपुराण, मत्स्य पुराण, ब्रह्मांडपुराण, वामन पुराण, महाभारत अशा अनेक प्राचीन ग्रंथात याबाबतचे संदर्भ मिळतात.

**प्रसिद्ध कवी आणि लेखकांद्वारे शिव महिमा**

संस्कृतातील आदि कवी वाल्मिकींनी तर 'राम आणि रावण' दोघांनाही शिव उपासक वर्णिलेले आहे. (संदर्भ युद्धकांड, सर्ग १२५, श्लोक २०-२१)

आजपासून जवळ जवळ अडीच हजार वर्षांपूर्वी राजा विक्रमादित्य होऊन गेला. त्याच्या नावाने विक्रम संवत् देखील आज उल्लेखले जाते. त्या राजाने सोमनाथ येथे शिवलिंग स्थापून त्याची पूजा केली असे मानणारे अनेक अभ्यासक आहेत.

महाकवी कालिदासाने 'मेघदूत आणि रघुवंश' या दोन काव्यात 'महाकाल' म्हणजेच शिवाची स्तुती केल्याचे दिसून येते. इतर संस्कृत कवी, जसे भास, भवभूति, पद्‌मगुप्त इत्यादी कवींनीसुद्धा शिवाचा महिमा वर्णिलेला आहे. पातंजलींच्या योगदर्शनचा संदर्भ तपासला तर त्यात परमात्मा शिवाला 'सर्वव्यापक न मानता, पुरुष विशेष मानले गेले आहे. इतकेच नव्हे तर शिवाचे धाम एक आहे (परमधाम) आणि तो ज्योतिस्वरूप आहे हेच सांगितले आहे.

प्रसिद्ध राजा भोज, राजा भर्तृहरि हे देखील शिव उपासक होते असा उल्लेख आढळतो. मेवाड प्रांतातील महाराणा प्रताप शिव उपासक होते. त्यांची युद्ध गर्जना 'जय एकलिंगजी' होती असे इतिहास सांगतो. मराठ्यांची युद्धगर्जना 'हर हर महादेव' होती.

काळाच्या ओघात शिव आणि शिवलिंगाबद्दलच्या समजुती बदलत गेल्या. शिवलिंग पूजा म्हणजे शिस्नपूजा असा गैरसमज निर्माण झाला. त्यामुळे तामसी किंवा वामपंथियांनी शिवलिंगाविषयीचे गैरसमज उपासनेतील आधार मानले. आघोरी साधनेपासून दूर जाण्याच्या प्रयत्नात समाजाने विष्णू, श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादी देवतांची पूजा अंगीकारली. तिथून पुढील काळात मानवाच्याच श्रेष्ठ रूपाचे म्हणजे देवतांचे पूजन करण्याची प्रथा रुढ झाली.

या सर्व ऊहापोहाचे तात्पर्यच काढायचे झाले, तर म्हणता येईल. ईश्वर निराकार आहे, त्याला कुठलाही देहाकार नाही म्हणून शिवलिंगाच्या आकाराद्वारे त्यांची पूजा केली जाते. पूर्वापार म्हणजे अगदी अडीच हजार वर्षांपासून शिवाची उपासना केली जात आहे.

***

# शिव मंदिरातील प्रथांचा आध्यात्मिक अर्थ

ब्र.कु. बाळू, सोलापूर

शिवलिंगाच्या पूजेबाबत काही निरीक्षणे आणि त्यामागचे आध्यात्मिक रहस्य काय असावे असा प्रश्न अनेकांच्या मनी यापूर्वी डोकावला असेल.

**शिवलिंगाकार**

या प्रतिमेचे मूलतः दोन भाग मानले तर त्यातील एक उभा भाग अंगुष्ठाकार आहे आणि दुसरा त्याचा पाया गोलाकार आहे. वेदांच्या काळात किंवा त्याही पूर्वीच्या काळी अनेकांना ईश्वराच्या निराकार रूपाचा किंवा ज्योतिस्वरूपाचा साक्षात्कार झाला. काही ऋषीमुनींना ध्यानावस्थेत प्रकाशाचा पुंज/पुंजका अंगठ्याच्या आकाराप्रमाणे दिसला. अशा ज्योतिस्वरूपास मूर्तरूप काय द्यावे असा प्रश्न सोडविताना शिवलिंगाचा आकार जन्माला आला म्हणूनच त्यातील उभा भाग आपल्या हाताच्या अंगठ्याप्रमाणे दिसतो आणि त्याचा पाया कल्पनाचित्रात उभा केला तर एखाद्या ज्योती समान भासतो. लिंग या शब्दाचा पुरुष किंवा स्त्रीवाचक अर्थ नसून एखादे चिन्ह हाच अर्थ योग्य आहे. हा अर्थ संस्कृतातून जसाच्या तसा घेण्यात आला आहे. मात्र वामपंथियांनी विकृत अर्थ घेतला व पुरुष आणि स्त्रीच्या भोगेन्द्रियाच्या मीलनाचे प्रतीक मानले.

**शिवाच्या प्रतिमेस धोतऱ्याचे फूल वाहतात.**

सर्व देव–देवतांच्या मूर्तीस किंवा प्रतिमेस सुगंधी फूल वाहतात. मात्र विषारी धोतऱ्याचे फूल शिवास अर्पण करतात. आध्यात्मिकदृष्ट्या आपल्या मनातील विकारांचे विष आपण शिवाला अर्पण करतो त्याचे स्थूल रूप धोतऱ्याचे फूल आहे. एक शिवच अशा प्रकारचे विष पचवू शकतो.

**शिवमंदिरात प्रवेश करताना**

शिवमंदिरात प्रवेश करताना नंदी अथवा नंदीगण दाखवितात. आपल्या कथा पुराणात प्रत्येक देव–देवतेस कुठला तरी प्राणी वाहन रूपात दाखविला आहे. जसे देवींचे वाहन वाघ, सिंह किंवा हंस, श्रीगणेशाचे वाहन मूषक त्याप्रमाणे शिवाचे वाहन नंदी दर्शवितात. खरे पाहता निराकार शिव हा स्वयंभू आहे म्हणजे तो सर्वांचा माता–पिता आहे; पण त्याचा कुणी माता–पिता नाही. शिव जन्म–मृत्यूच्या चक्रापासून मुक्त आहे कारण त्याला स्वतःचा देहच नाही. त्यामुळे शिवाला दिव्य अवतरणाद्वारे मानवोद्धार करावा लागतो. ज्या स्थूल मानवी देहाचा आधार घेऊन शिव प्रकट होतात. त्याचे भौतिक रूप म्हणजे नंदीगण शिवमंदिराबाहेर पहायला मिळतो. भारतीय तत्त्वज्ञानानुसार आत्मा हा सारथी किंवा रथी मानला, तर देह हा रथ कल्पिलेला आहे. या न्यायानुसार शिवाचा रथ, त्याच्या मंदिराबाहेर दाखविला जातो.

अनेकदा शिवमंदिरात गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी उंबरठ्याजवळ कासव असते. ज्याप्रमाणे आवश्यकता नसेल तेव्हा कासव आपली कर्मेन्द्रिये आवरून घेते तद्वत शिवासमोर जाताना आपली कर्मेन्द्रियात अडकलेली मन–बुद्धी आवरून घेणे अपेक्षित आहे. साधकाने आपली बाह्यमुखता सोडून अंतर्मुखी होऊन ध्यानमग्न होणे ही खरी साधना आहे.


देवळातील घंटा वाजविण्यामागे अनेक जण म्हणतात, आपण आल्याची देवाला वर्दी देण्याकरिता घंटा वाजवली जाते. काही जण तर म्हणतात, देवाला जागं करण्यासाठी घंटा वाजवतात. देवाला जागे करणे की स्वतः आध्यात्मिकदृष्ट्या जागे होणे गरजेचे आहे? विचार करून पहा.

गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी त्याच्या दरवाज्याची चौकट कमी उंचीची असते. आपल्याला वाकूनच जावे लागते. आपल्या अहंकाराचे मुकुट उतरवून मग गर्भगृहात प्रवेश करावा हीच शिकवण यामागे असावी.

अनेक देवदेवतांच्या मंदिरातील गर्भगृह, बाहेरील सभामंडपाच्या सम पातळीवरच असते. मात्र शिवमंदिरातील गर्भगृह पायऱ्या उतरून खाली जाण्याकरिता निम्न उंचीवर असते. शिव निराकार आहे, त्याचे कार्य गुप्त आहे याचेच ते द्योतक आहे.

शिवलिंगावर दुग्धाभिषेक किंवा जलाभिषेक करतात. शिव हा ज्ञानाचा सागर आहे. त्याच्या शक्ती आणि गुण


(पृष्ठ क्र.१२ वर)




'ईश्वराने सृष्टीची निर्मिती केली आणि देवांनी तिचा  सांभाळ केला असे काही  उल्लेख आढळतात. म्हणजेच ईश्वर किंवा सर्वोच्च सत्ता वेगळी आणि इतर देव-देवता वेगळ्या आहेत. शिवाबद्दल उल्लेख केला जातो - शिव परमात्माय नमः मात्र शंकराविषयी म्हणतात 'शंकर देवताय नमः. निराकार ज्योतिस्वरूप परमेश्वराविषयी आपल्या श्रद्धा प्रकट करण्यासाठी शिवलिंगाची रचना करण्यात आली. शिव म्हणजे कल्याणकारी आणि लिंग शब्दाचा संस्कृत भाषेतील अर्थ 'चिन्ह' असा आहे. शंकर ही देवता, 'दिक्'म्हणजे दिशा हेच वस्त्र नेसलेली दाखवतात. अर्थात आध्यत्मिकदृष्ट्या ज्याने देहभानरूपी वस्त्राचाही त्याग केलाय, जो नित्य साधनेत मग्न आहे, ज्याने ज्ञानचक्षू उघडा ठेवून तप केले असा साधक. शंकर हे वैराग्यपूर्ण साधकाच्या अप्रतिम स्थितीचे रूप होय. उपास्य शक्ती म्हणजे शिव आणि उपासक म्हणजे शंकराची स्थिती आहे.




योग शब्द 'युज्' या संस्कृत धातूपासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ आहे 'जोडणे'. मन-बुद्धी परमेश्वराशी जोडणे म्हणजे त्याच्याशी योग साधणे. नश्वर देहाचे भान त्यागून, निराकार शिव परमात्म्याची आठवण करणे म्हणजे 'राजयोग' होय. राजयोगाच्या नित्य अभ्यासाने अनेक शक्तींचा संचय साधकाच्या ठायी होऊ लागतो. उदाहरणार्थ सहनशक्ती आणि सामावून घेण्याची किंवा क्षमा करण्याची शक्ती. सहनशक्ती म्हणजे दुबळेपणा नव्हे तर, धरित्रीप्रमाणे उदार अंतःकरणाने एखाद्याची चूक माफ करणे. याचप्रमाणे या सर्व शक्ती मोठ्या जीवनोपयोगी आहेत. मनाचा पसारा आवरता घेणे आणि आपला कर्मव्यापाचा बाड-बिस्तारा आटोपून ठेवणे हेच अध्यात्माचे सार आहे.


राजयोगाच्या अभ्यासातून दिव्य गुण आणि शक्ती प्राप्त होतात.
त्या लहरी वातावरणात पसरतात. ही एक गुप्त सेवा योगिजन करतात.

# भारतातील प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगे



बैद्यनाथ



ओंकारेश्वर



भीमाशंकर



काशी विश्वेश्वर



केदारेश्वर



नागेश्वर नागनाथ



महाकालेश्वर



रामेश्वर



मल्लिकार्जुन



त्रयंबकेश्वर



घृष्णेश्वर



सोमनाथ

# बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक रहस्य

**ब्र.कु. पुष्पा, नाशिक**

**सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।**
**उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम्।।**
**वैद्यनाथम् चिताभूमो च डाकिन्यां भीमशङ्करम्।**
**सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने।।**
**वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे।**
**हिमालये तु केदारं घुश्मेशं च शिवालये।।**

भारतातील १२ ज्योतिर्लिंगांची नावे असलेला हा श्लोक अनेकांना मुखोद्गत असेल. भारतात प्रत्येक लहानमोठ्या गाव व शहरात आणि तसेच जगभरात असलेल्या हजारो शिवमंदिरांतही विशेष बारा शिवलिंग 'ज्योतिर्लिंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. ज्योतिर्लिंग म्हणजे ज्योति अर्थात 'प्रकाशस्वरूप चिन्ह' (लिंग अर्थात चिन्ह). पिढ्यानुपिढ्या अत्यंत श्रद्धेने आणि भक्तिभावाने या शिवलिंगांची पूजा केली जाते. ज्योतिर्लिंग हे निराकार परमात्म्याचे प्रतीक आहे. या १२ ज्योतिर्लिंगांची विशिष्ट नावे का आहेत? त्यांच्याशी निगडित काय कथा आहेत? आणि त्यामागे काही विशेष रहस्य आहे का हे या शिवरात्रीच्या निमित्ताने जाणून घेऊ या.

**सोमनाथ :** गुजराथेतील सौराष्ट्र येथे समुद्राजवळ प्राचीनतम सोमनाथ ज्योतिर्लिंग आहे. सोम म्हणजे चंद्र. असे म्हटले जाते, की येथे ज्योतिर्मय परमात्म्याकडून चंद्राला तेज प्राप्त झाले. ज्ञानसूर्य परमात्म्याकडून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशाने अज्ञानरूपी अंधकार दूर होतो. सोम या शब्दाचा दुसरा अर्थ आहे अमृत. अज्ञानाने ग्रासलेल्या, दुर्बल झालेल्या जनसामान्यांना पुन्हा बलशाली करणारे परमात्म ज्ञान हे अमृतासमान आहे.

**मल्लिकार्जुन:** आंध्र प्रदेशातील श्रीशैलम् या पर्वतावर स्थित मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग मंदिर. मल्लिका या शब्दाचा एक अर्थ आहे शुभ्र रंगाचे अति सुगंधित पुष्प. ज्योतिर्लिंग रूपात पूजिले जाणाऱ्या सच्चिदानंद परमात्मा शिवाचे अति सुंदर ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. सत्यम शिवम सुंदरम आहे. हेच दिव्य आकर्षक स्वरूप श्री क्षेत्र मल्लिकार्जुन म्हणून प्रसिद्ध आहे.

**महाकालेश्वर :** मध्य प्रदेशातील ऐतिहासिक उज्जैन नगरीमध्ये स्थित आहे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग. परमात्मा शिवाला 'महाकाल' संबोधले जाते. परमात्मा जन्म-मृत्यूच्या चक्रात येत नाही. या मृत्युलोकात प्रत्येक मनुष्याला योग्य वेळी नश्वर देहाचा त्याग करावा लागतो. परंतु शिव परमात्म्याचे अजर अमर अविनाशी सत्य स्वरूप जाणल्यानंतर मनुष्य अकाली मृत्यूच्या भयातून मुक्त होतो. म्हणून महाकालेश्वर हे ज्योतिर्बिंदू शिव परमात्म्याद्वारे मनुष्याला प्राप्त होणाऱ्या आत्मिक ज्ञानाचे प्रतीक आहे.

**ओंकारेश्वर :** ॐचा अर्थ आहे- मी ज्योतिर्बिंदु आत्मा आहे. सर्व आत्म्यांचा पिता परमात्मा शिव हा देखील अखंड ज्योतिस्वरूप आहे. मात्र ज्योतिर्लिंगाप्रमाणे मोठा आकार नसून तो बिंदुस्वरूप आहे. केवळ बिंदूची पूजा करण्यास कठीण असल्याकारणाने शिवलिंगाच्या रूपात त्याचे पूजन केले जाते. कलियुगाच्या या अंतिम चरणामध्ये अवतरित होऊन परमात्मा 'ॐ' अर्थात आत्मिक रूपाचे सत्य ज्ञान मनुष्यास देतो. याचेच स्मृतिचिन्ह म्हणजे ओंकारेश्वर मंदिर आहे. तिथेच स्थित असलेले अमलेश्वर हे मनुष्य आत्म्यांना निर्मल (पवित्र) करणाऱ्या परमात्मा शिवाचे मंदिर आहे. निर्मल अर्थात पापविरहित. निराकार परमात्म्याशी मन आणि बुद्धीच्या एकाग्रतेद्वारे जोडले गेल्यास पापक्षालन होते.

**वैद्यनाथ (वैजनाथ) :** महाराष्ट्रात परळी जवळ स्थित असलेले प्राचीन ज्योतिर्लिंग वैद्यनाथ. एखाद्या असाध्य रोगाने ग्रस्त व्यक्तीवर इलाज करताना ज्यावेळी सारे उपाय हरतात; त्यावेळी स्वाभाविकच वैद्यांचा वैद्य परमात्म्याचे स्मरण होते. रोगाचे मूळ कारण हे वास्तविक पूर्वकर्माचे फळ असून या दुःखातून, या पीडेतून खऱ्या अर्थाने मुक्ती एक परमात्माच देऊ शकतो. परमात्मा शिव अवतरित होऊन ज्यावेळी ज्ञान आणि सहज राजयोगाचा उपाय सांगतात, त्यावेळी केवळ शारीरिक नव्हे, तर आत्म्याच्या अंतरंगात लपलेल्या काम-क्रोधादि विषय-विकार रुपी विषापासून मुक्ती तसेच जीवनमुक्ती प्राप्त होते. म्हणूनच शिवाला अमृतेश्वर अथवा नीळकंठेश्वर असेही संबोधले जाते.

**भीमाशंकर :** शास्त्रात असलेल्या वर्णनानुसार अशी कथा आहे, की भीमाशंकर या स्थानावर त्रिपुरासुर नामक राक्षसाला परमात्मा शिवाने आपल्या शक्तींनी पराभूत केले. तेव्हापासून हे स्थान दुष्ट शक्तींवरील विजयाचे प्रतीक ठरले. हे स्थान आपल्याला सर्वशक्तिमान परमात्म्याची स्मृती करून देते. कलियुगाच्या अंतिम चरणांत ज्यावेळी मनुष्यात आसुरी प्रवृत्ती प्रबळ झाल्या आहेत, अशा धर्मग्लानीच्या युगात परमात्मा शिवाचे दिव्य अवतरण होते. त्याने दिलेल्या दिव्य ज्ञानामुळे मनुष्याची आत्मिक शक्ती पुन्हा जागृत होऊन पवित्रता, सुख, शांती सारख्या दिव्य गुणांची पुन्हा प्राप्ती होते. याच घटनेचे प्रतीकात्मक रूप ही असुर-वधाची कथा प्रसिद्ध आहे.

**रामेश्वर :** तामिळनाडूमध्ये समुद्र तटाजवळ प्रभू श्रीरामाने रामेश्वर ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापना केली असे मानले जाते. असे म्हणतात, की रावणावर विजय प्राप्त करण्यासाठी युद्धापूर्वी श्रीरामाने परमात्मा शिवाचे स्मरण करून त्यांच्याकडून वरदान प्राप्त करून घेतले. यावरून हे सिद्ध होते, की शिव परमात्मा केवळ साधारण मनुष्यांचेच नव्हे, तर देवतांचे ही पूज्य परमपिता आहेत. अर्थात्, कोणतीही शरीरधारी देवता, परमात्मा नसून, परमात्मा हा निराकार ज्योतिर्बिंदु आहे. हे ज्योतिर्लिंग सर्व आत्म्यांच्या ठायी परमात्म्याप्रती असलेल्या अगाध भक्तीचे प्रतीक आहे.

**नागेश्वर नागनाथ :** महाराष्ट्रात स्थित असलेल्या या प्राचीन मंदिराचा उल्लेख शिवपुराणात देखील आढळतो. बहुतेक सर्वच शिवमंदिरांमध्ये शिवलिंगावर पंचमुखी नाग पाहावयास मिळतो. वास्तविक पाहता सर्प हा मानवी जीवनात विषाप्रमाणे पसरलेल्या पांच विकारांचे प्रतीक आहे. परमधाम निवासी शिव परमात्मा आपल्याला शक्ती प्रदान करून या विकारांवर संपूर्ण विजय प्राप्त करवतात. म्हणून त्यांना नागेश्वर नागनाथ असे संबोधले आहे.

**विश्वेश्वर :** इतिहासप्रसिद्ध वाराणसी नगरात गंगातटावर स्थित आहे श्री काशी विश्वनाथ मंदिर. त्रिमूर्ती शिव परमात्मा अखिल विश्वातल्या सर्व मनुष्य आत्म्यांचा पारलौकिक पिता आहे. सर्वधर्मीय लोक परमात्म्याला निराकार मानतात. पाच तत्वांपलीकडे दिव्य प्रकाश लोकात- परमधामात निवास करणाऱ्या शिव परमात्म्याच्या विश्वकल्याणकारी कर्तव्यांचे प्रतीक आहे श्री काशी विश्वेश्वर ज्योतिर्लिंग.

**त्र्यंबकेश्वर :** नाशिकजवळ गोदावरी नदीच्या किनाऱ्यावरील प्राचीन देवस्थान त्र्यंबकेश्वर. त्र्यंबक अथवा त्रिंबक म्हणजे तिसरा नेत्र. चर्मचक्षुंद्वारे ज्या गोष्टी पाहता येत नाहीत, त्या दिव्य बुद्धीच्या नेत्रांनी पाहणे शक्य आहे. शिव परमात्म्याचे या सृष्टीवर दिव्य अवतरण होऊन त्याच्या दिव्य ज्ञानाच्या प्राप्तीने मनुष्याची दिव्य बुद्धी विकसित होऊ लागते अर्थात् त्याला दिव्य बुद्धिरूपी तिसरा नेत्र प्राप्त होतो. ही प्राप्ती करवणाऱ्या परमात्म्याची स्मृती म्हणजे त्र्यंबकेश्वर. याखेरीज, सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय (स्थापना, पालना आणि विनाश) या परमात्मा शिवाच्या तीन कर्तव्यांचेही प्रतीक म्हणजे त्र्यंबकेश्वर.

**केदारेश्वर :** बर्फाच्छादित हिमशिखरांमध्ये वसलेले अतिप्राचीन केदारनाथ मंदिर. १२ ज्योतिर्लिंगांतही या मंदिराचे महत्त्व विशेष आहे. अत्युच्च शिखरांवर स्थित असे हे मंदिर परमात्मा शिवाचे निवासस्थान अर्थात् पाच तत्वांच्या पलीकडे असलेल्या ब्रह्मलोक अर्थात् परमधामाचे स्मरण करून देते. यामागचे आणखी एक रहस्य म्हणजे ज्याप्रकारे हिमालयात प्रवास करत चढून गेल्यानंतरच केदारनाथाचे दर्शन होते, त्याचप्रकारे, उच्च श्रेष्ठ संकल्प आणि मनाची शांत आणि शीतल स्थिती असेल तरच सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे मंगल मिलन होऊ शकते.

**घृष्णेश्वर:** एका प्रचलित कथेनुसार, पार्वतीने कुंकुम, केशर आणि शिवालयातील पवित्र जल हातात घेऊन घर्षण केले, त्या घर्षणातून या ज्योतिर्लिंगाची निर्मिती झाली आणि त्यातून दिव्य ज्योतिस्वरूप प्रकट झाले. ज्ञानसागर परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाल्यावर जर त्या ज्ञानाचे मनन - चिंतन केले, तर या ज्ञान-घर्षणातून मनुष्याच्या बुद्धिचे तेज वाढू लागते. जड वस्तु-विकारांमध्ये रममाण होऊन मलिन झालेली बुद्धी दिव्य होऊ लागते. हा या प्रतीकात्मक कथेमागचा खरा अर्थ आहे.

या बारा ज्योतिर्लिंगाचे स्मरण सकाळ संध्याकाळ अर्थात सर्वदा करावे, त्यांच्या स्मरणाने अनेक जन्मांतरीची पापकर्म नष्ट होतात, तसेच या जन्मातही पापकर्मांपासून परावृत्त होण्याची शक्ती मिळते.

परमात्मा शिवाची १२ ज्योतिर्लिंग या महिन्यांत स्मरण करण्याचेही विशेष महत्त्व आहे. उत्तर भारतात फाल्गुन महिन्यात महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी केली जाते.

(पृष्ठ क्र.१६ वर)

# शिवरात्रीचे रहस्य

## ब्र.कु. सारिका, दापोली

प्रचलित पौराणिक कथेनुसार शिवरात्रीच्या व्रताची कथा अशी आहे. एक पारधी शिकारीसाठी जंगलात जातो. त्याला हरिणाची जोडी दिसते आणि तो त्यावर नेम साधतो आणि हरणाच्या जोडीचे लक्ष त्याच्याकडे जाते. ती जोडी पारध्याला विनंती करते, आम्ही घरी जाऊन आमच्या पाडसांना भेटून येतो मगच तू आमचे प्राण घे. पारधीही या गोष्टीस संमती देतो आणि त्यांची वाट बघत एका झाडावर चढतो. रात्र होते, अंधार दाटू लागतो दिसण्यास अडथळा येणारी पाने तोडून पारधी खाली टाकत राहतो. इकडे हरणाची जोडी पाडसांना शेवटचे भेटते आणि कळपाला सांगते, 'तुम्ही यांची काळजी घ्या आम्हाला आता मृत्यूला सामोरे जायचे आहे. हे ऐकताच कळपातील काही हरणे म्हणतात, 'तुम्ही आपल्या बाळांचा सांभाळ करा, आम्ही तुमच्या ऐवजी जायला तयार आहोत. असे करता करता सगळा कळपच बलिदानास तयार होतो. सगळी हरणे पारध्याच्या समोर येऊन उभी ठाकतात तोवर सकाळ उजाडते. रात्रभर पारधी बेलाच्या झाडावर चढून बसला होता आणि त्याची पाने खाली टाकत होता तिथे शिवलिंग होते हे त्याच्या लक्षात येते तांबडं फुटू लागल्यावर. त्याच्या हातून नकळत शिवलिंगावर बेलपत्र वाहिली गेली होती. इतकी सगळी हरणे आलेली पाहून त्याचे हृदय द्रवते. त्या मुक्या प्राण्यांचा आपसांतील स्नेहबंध पाहून तो त्यांना न मारण्याचे ठरवतो. या सगळ्या घटनेतून पारध्याच्या मनांत भक्तिभाव जागृत होतो, मनापासून तो शिवाची आराधना करतो आणि आपण एका पापकृत्यापासून बचावलो याबद्दल शिव परमात्म्याचे आभार मानतो. पारध्याला उपरती होते म्हणून शिव प्रसन्न होतात आणि प्रकट होऊन त्याचा उद्धार करतात. ही घटना शिवरात्रीच्या दिवशी घडते त्यामुळे या दिवसाचे महत्त्व वर्णिले जाते.

आता यामागील आध्यात्मिक अर्थ काय असावा? वरकरणी पाहता लहान मुलांसाठी सांगितलेली ही कथा वाटते. मुळात शिवलिंगाची स्थापना आणि पूजा का केली जाते ही मननीय गोष्ट आहे. याबाबत जनमानसात पूजेविषयी रस निर्माण व्हावा म्हणून गोष्ट रंजक करून सांगितली जाते. शिवरात्रीबाबत एक समज आहे – या रात्रीच शिवाने महासंहार घडवून आणला. ''निराकार ज्योतिर्लिंग शिवाने' संहार तरी कसा केला किंवा नवसृष्टीची रचना कशी केली? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. वास्तविक गोष्ट आहे कि निराकार शिव, प्रजापिता ब्रह्माच्याद्वारे सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना करतात आणि शंकराद्वारे कलियुगी पतित सृष्टीचा विनाश करवितात. परंतु आपण हे जाणत नाही की सत्ययुग आणि सरणारे कलियुग यामधील संधीकालास पुरुषोत्तम संगमयुग म्हटले जाते. मनुष्यात्म्याच्या उन्नतीचा हाच काळ आहे. शिव स्वतः अवतरित होऊन ब्रह्माच्या शरीराचा आधार घेऊन आपला परिचय देतात. निजानन्द स्वरूपं शिवोऽहम्, ज्ञानस्वरूपं शिवोऽहम् आणि प्रकाशस्वरूपं शिवोऽहम्.

ब्रह्मामुखाद्वारे जे दिव्य ज्ञान शिव पिता देतात. ते जणू गंगेसमान पावक आहे. स्थूल पाणी तर शरीराला भिजवू शकते; पण आत्म्याला ज्ञान गंगेचा स्पर्श होऊ शकतो. केवळ शिवच असे पावन बनविणारे ज्ञान देऊ शकतो. म्हणून शिवाला 'गंगाधर' म्हटले आहे. त्याचप्रमाणे 'सुधाकर' ही म्हटले गेलेय. अमृतासमान असणारे ज्ञान देऊन जीवनोद्धार करणारा म्हणून तो सुधाकर. इतर शक्तींचा उल्लेख येतो – आपल्या जीवनात शिवाचे ज्ञान धारण करून मनुष्यात्म्यांची सेवा करतात याकारणास्तव त्यांचे गायन–पूजन शक्तींच्या रूपात शिवासोबत केले जाते. अज्ञानरूपी रात्रीच्या कालावधीत हे घडते म्हणून शिवरात्रीचे महत्त्व साजरे केले जाते. ज्ञानाच्या आधारे मनुष्यात्म्यात पाप–पुण्याविषयी जागृती आणतात. त्यामुळे पतित–पावन ही शिवाची उपाधी सार्थ ठरते. मनुष्यात्म्यांना मुक्ती देतो म्हणून शिवाला 'मुक्तेश्वर' म्हटले जाते. क्षणात किंवा अल्पावधीत सन्तुष्ट होणारा म्हणून 'आशुतोष' हे नावही सिद्ध होते.

शिवरात्रीचा हाच खरा महिमा आहे. शिवाचे ज्ञान अंगी बाणवून त्यानुसार वागणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिवरात्र साजरी करणे असे म्हणता येईल.

***

(पृष्ठ क्र.५ वरुन)
पाहिले तर वाटते खरोखरीच परमेश्वर सर्वव्यापी आहे. अर्थात प्रत्येकाच्या हृदयात त्याचेविषयी भक्तिभाव आहे. पण परमधामातून तो येतो आणि पतितांना पावन करतो. त्यामुळे तो तशा रुढार्थी सर्वव्यापक नाही.

जेव्हा मनुष्यात्म्यांची अति पतित अवस्था येते. कलियुगाचा अंत जवळ येऊन ठेपतो तेव्हाच परमेश्वर येतो. तीच वेळ सांप्रत समयी आहे. म्हणूनच त्याचे अवतरण झाले आहे. तो सर्व गुणांचा आणि शक्तींचा सागर आहे.

हाच परमेश्वराचा यथार्थ परिचय त्याने स्वतः येऊन दिला आहे. जेव्हा आपण या गोष्टी नीट समजून घेऊ तेव्हाच आपण त्याची यथार्थ आठवण करू शकतो. मन-बुद्धी एकाग्र करू शकतो. जर देव सर्वव्यापक असेल तर मन-बुद्धी एकाग्र होण्यात अडचण आहे, नक्की कुठे एकाग्र करायचे.

**एवढ्या चर्चेनंतर सहजपणे म्हणता येईल की ईश्वर एकच असून तो निराकार आहे. निराकार म्हणजे कुठलाही आकार नाही आणि म्हणून तो सर्वव्यापी आहे अशी समजूत करून घेण्यात मात्र अर्थ नाही. निराकार म्हणजे मनुष्यासारखा त्याला देहाकार नाही. अशा ज्योती स्वरूपाविषयी जगभरातील संकल्पना नीट समजून घेतल्यास धार्मिक समजुतींच्या आधारे असलेले भेदभाव नष्ट करण्यास मदत होईल. जर आपण मनुष्यात्मे एकाच परमेश्वराची मुले आहोत तर आपसांतील नाते खऱ्या अर्थाने भावा-भावाचे आहे हे जाणवू लागेल. 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना कागदावरच न राहता जीवनात धारण करता येईल. असा आध्यात्मिक अर्थ जीवनात आचरणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिवरात्र साजरी करणे सार्थ होईल यात शंकाच नाही.**

***

(पृष्ठ क्र.८ वरुन)
अक्षय आहेत म्हणूनच सततचा जलाभिषेक केला जातो. इतकेच नव्हे तर शिवमंदिर समुद्राच्या काठी किंवा नदीकाठी, तलावाकाठी वसवल्याचे पहायला मिळते. शिवाची शक्ती, गुण आणि त्याच्या क्षमता सागरासमान अगणित आहेत याचेच द्योतक आहे. उदा. रामेश्वर

शिवमंदिराची स्थापना उंच पर्वतावर केल्याचेही अनेकदा पहायला मिळते. तो सर्वोच्च आहे, सर्वशक्तिमान आहे हे स्थूलरुपाने दर्शविण्यासाठी उंचावरच्या स्थानाची निवड करतात. उदा. अमरनाथ.

सर्व देव-देवतांना पूर्ण प्रदक्षिणा घालून नमस्कार करतात. मात्र शिवमंदिरातील शिवलिंगास पूर्ण परिक्रमा करत नाहीत. त्याच्या पन्हळीसारख्या भागापर्यंत जाऊन परत फिरतात. आध्यात्मिक दृष्ट्या शिवाने दिलेला आदेश किंवा श्रेष्ठ उपदेशाचे उल्लंघन न करणे अपेक्षित आहे.

भारतीय परंपरेतील सर्वात प्राचीन उपासनेबाबत या गोष्टी जाणून घेण्यात आनंद आहे.

***

## ❋ विशेष निवेदन ❋

शिवरात्रीनिमित्त प्रकाशित केलेल्या विशेषांकासाठी सर्व सेवाकेंद्राच्या टीचर बहिणींनी भरभरून प्रतिसाद दिला याकरिता मनापासून धन्यवाद ! आपल्या सगळ्यांचा उत्साह आणि सक्रिय पाठिंबा असाच कायम राहो. 'कोविडच्या काळात' 'अमृत कुंभ' कदाचित बंद पडले अशी अनेकांनी समजूत करून घेतली असावी. पण आता आपल्या लक्षात आलेच असेल, अमृतकुंभ द्वैमासिक निर्विघ्नपणे चालू आहे. इथून पुढल्या काळातही चालू राहील. नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि टीचर बहिणींनी अनुभवाचे बोल, मार्गदर्शनपर लेख आणि कविता इत्यादी साहित्य पाठवून दर्जेदार अंकनिर्मितीत हातभार लावावा ही विनंती. त्याचप्रमाणे चढत्या आलेखाने अंकसंख्या वाढवावी हा विशेष आग्रह. वर्षभरात कुठल्याही महिन्यापासून सदस्य होऊ शकता. वार्षिक वर्गणी मात्र रू. ८५/- आणि आजीव सदस्यत्व केवळ रू. १५००/- आहे याची नोंद असावी.

# शिवरात्र सर्वात मोठा सण

**ब्र.कु. उमेश, सांगली**

वर्तमान काळ हा बातम्यांचा आणि प्रसारमाध्यमाचा आहे. आज एवढ्या विपुल प्रमाणात वर्तमान पत्रे प्रकाशित होतात, त्यात अवकाशापासून पाताळापर्यंतच्या सर्व घडामोडींचे वृत्तांत मिळतात. रेडियो, टेलिव्हिजन इत्यादी माध्यमांतून विविध बातम्या वेगाने प्रसारित होऊ शकतात. परंतु त्यात कुठेही परमेश्वराविषयी कुठलीही बातमी नसते. हा काय न्याय आहे?

आज इतकी शक्तिशाली माध्यमे असूनही त्याद्वारे कुठेही परमेश्वराविषयीची माहिती प्राप्त होत नाही. आज Who is who या विषयावर डिरेक्टरी छापली जाते. त्यात जगातील प्रसिद्ध व्यक्तींची नावे झळकतात; पण कुठेही परमपिता परमात्म्याविषयी उल्लेख नसतो. फोन डिरेक्टरीत अग्निशमन दल, पोलीस इत्यादी अत्यावश्यक सेवांची माहिती असते; पण काम-क्रोधादि आग विझवणारा, दुःख-अशांतीपासून रक्षण करणाऱ्या परमात्म्याशी कुठलाही संपर्क करण्याविषयीची माहिती नसते.

यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की माहिती प्रसार माध्यमांकडे परमात्म्याविषयी कुठलीही माहिती नाही. पशू-पक्षी-वस्तूंबद्दलच्या माहितीचे भांडार भरलेले आहे. परंतु परमात्म्याविषयी स्पष्ट, निर्विवाद माहिती मिळत नाही. निसर्गातील विषयांवर अनेक जण संशोधन करत आहेत. पण कुणाकडेही परमात्म्याविषयीचे ज्ञान उपलब्ध नाही.

**भारताव्यतिरिक्त इतर देशांच्या अभिप्रायावर विचार**

भारताबाहेरील धर्मांचा विचार केला तर उदाहरणार्थ ख्रिस्ती धर्माचे अनुयायी म्हणतात. येशू ईश्वराचा पुत्र होता. तर ईश्वर म्हणजे कोण? आपले त्या ईश्वराशी काय नाते काय आहे? मुसलमान बांधव म्हणतात खुदाचा पैगंबर म्हणजे मुहम्मदसाहिब. पण खुदा कोण? तो कसा आहे? कुठे आहे? त्याच्याशी आपले अनुसंधान कसे जोडायचे त्याची माहिती मिळत नाही.

**अविनाशी भारतखंडातील सनातन धर्माबाबत विचार**

जेव्हा आपण विचार करतो तेव्हा भारतच सर्वात प्राचीन देश असल्याचे लक्षात येते. येथील सर्व प्राचीन आणि सनातन धर्माकडे सर्वांचे लक्ष जाते. या धर्मातील पवित्र पूज्यस्थानेही अति प्राचीन आहेत. बहुसंख्य लोकांमध्ये परमात्म्यांविषयी ४ गोष्टींमध्ये विशेष एकमत आहे.

१) परमात्मा ज्योतिस्वरूप आहे.

२) परमेश्वर जन्म-मृत्युपासून न्यारा आहे.

३) परमात्मा सर्वांचा माता-पिता आहे; पण त्याचा कुणी माता-पिता नाही. यावरून निष्कर्ष निघतो की, परमेश्वराचे ना स्त्रीरूप आहे; ना पुरुषरूप. त्यास देहाकार नाही. त्यामुळे त्याची कुणी आई किंवा पत्नीही नाही. कुठलाही लौकिक संबंध पुत्र-कळत्र आणि दारा अशी नाती नाहीत.

४) परमेश्वर परम-पवित्र अर्थात निर्विकारी आहे. ज्ञान, शांती, आनंद वगैरे गुणांचा सागर आहे. दाता आहे. विश्वाचा निर्माता आहे. जगन्नियंता आहे. कल्याणकारी आहे. सदा मुक्ती जीवनमुक्तीचा दाता आहे. देवांचा देव महादेव आहे. त्रिलोकी नाथ आहे.

या चार गोष्टींचा विचार केला तर ब्रह्मा विष्णु शंकर, अंबा, दुर्गा, सरस्वती, श्रीकृष्ण, श्रीराम या कुठल्याही देवतेस वरील मुद्दे लागू होत नाहीत. केवळ एकच तत्त्व मानावे लागते ते म्हणजे निराकार ज्योतिर्लिंग रुप. ते पुरुष किंवा स्त्रीरूप नसून ज्योती स्वरुप आहे. भगवान शिवाची तीच खरी प्रतिमा आहे. समस्त मनुष्यात्म्यांना मुक्ती देणारा मुक्तेश्वर आणि तिन्ही लोकांचा नाथ असणारा त्रिभुवनेश्वर आणि तो कालातीत असल्याकारणाने 'महाकालेश्वर' देखील म्हणतात. शिवाचे रूप बिंदूस्वरूप असल्याकारणाने 'निराकार' असेही संबोधले जाते. त्यास माता-पिता ही म्हटले जाते (त्वमेव माता च पिता...) परमेश्वराचे दिव्य नाव 'शिव' आहे. त्यावरून स्पष्ट होते की तो सर्वांचा कल्याणकारी आहे. तोच ब्रह्मा-विष्णू-शंकराचाही रचयिता आहे. अर्थात् देवांचाही देव आहे.

**'ब्रह्मा विष्णू आणि हर त्यासी निर्मीता तोचि थोर**
**तो ओळखावा परमेश्वर नाना यत्ने' (दासबोध -६/१/१२)**

पुराणातील काही कथांनुसार श्रीरामांनी देखील रामेश्वर येथे शिवलिंगाची पूजा केली आणि श्रीकृष्णानेही

पूजा केली त्यास गोपेश्वर म्हटले जाते. संशोधकांनी सांगून ठेवले आहे, त्यांच्या (शिवाच्या) प्रतिमेचे सर्वत्र अवशेष आढळतात आणि पूजा केली जाई त्याचे संदर्भ मिळतात. हे एकच सार्वभौम रूप आहे. जे हिंदू-मुस्लीम ख्रिस्ती इ. सर्वांना मान्य असणारे ईश्वराचे रूप आहे.

मनुष्याला देखील ज्योतीस्वरुप आहे, बिन्दुरुप आहे. त्यामुळे मनुष्यात्म्याचा पिता परमात्मा देखील सूक्ष्म ज्योतिस्वरुप आहे. तेच त्याचे मूळ दिव्य रूप आहे.

शिव आणि शंकर एकच मानले गेले आहे ही एक मोठी गल्लत झाली आहे. ज्योतीस्वरूप शिव आणि शंकर ही देहधारी देवता वेगवेगळी आहेत. परंतु चित्रकारांनी पुरुषरूपाचा वापर करून शिव आणि शंकर एकच कल्पिले आहेत. चित्रकारांनी शिवाला पुरुष रूपात मानून त्याच्याविषयी भाव व्यक्त करण्यासाठी कल्पनेचा वापर केला. त्याद्वारे दाखविले की शिव ज्ञानचक्षुधारी आहे. स्वधर्मस्थित आहे. त्रिविध ताप हरणारा ज्ञानगंगा धारण करणारा आहे. भावनेच्या आधारे पुरुषरूपातील देहाकारास तिसरा नेत्र दाखविला. नंदीवर स्वारी दाखविली आहे. हातात त्रिशूळ घेतलेला त्रिविध ताप हरणारा दाखविला आहे. मस्तकावर गंगा दाखविल्याने 'गंगाधर' म्हटले आहे. अशाप्रकारे शिव आणि शंकर एक मानले गेले आहे. परंतु दोघांची नाम-रूप-कर्तव्ये भिन्न आहेत. शिव सर्वोच्च आहे आणि शंकर ही त्याची रचना आहे.

वास्तविक पाहता शिवरात्र म्हणजे परमपिता शिव परमात्म्याचे अवतरणाचे द्योतक आहे. शिव अवतरणाची स्मृती देणारा शुभ उत्सव आहे. विश्वाच्या रचनाकाराच्या अवतरणाचा उत्सव असल्याकारणाने (महाशिवरात्र) सर्वात मोठा उत्सव आहे. सर्वश्रेष्ठ आहे. रात्र शब्द धर्मग्लानी आणि अज्ञान अंधकाराचे सूचक आहे.

जेव्हा अज्ञानरुपी निद्रेत मनुष्यात्मा असतो. बुद्धी तमोगुणाच्या प्रभावाखाली असते. जेव्हा काम-क्रोधादि डाकू मानवाचा सुख शांतीरुपी खजिनाच लुटतात तेव्हा शिवपरमात्मा जगाच्या कल्याणासाठी अवतरित होतात. असा काळच कलियुगाचा अंतिम काळ आहे. अशा वेळेस परमात्मा स्वतः अवतरित होऊन गीता ज्ञान रूपी अमृत आणि योगरूपी प्रकाशाद्वारे मानवमात्रास सत्त्वगुणी बनवितो. याद्वारे सत्ययुगाची सुरुवात होते.

पुराणात वर्णन आढळते. नवीन सृष्टीच्या निर्मितीसाठी ज्योतिर्लिंग शिवाने ब्रह्माची निर्मिती केली आणि त्याद्वारे प्रकट झाले. या घटनेची आठवण म्हणून दरवर्षी महाशिवरात्रीचा सण साजरा केला जातो. कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा आरंभ यातील संगमयुगाचा काळ सध्या सुरू आहे. या आणि स्वतःच्या वास्तविक रुपास ओळखू या आणि शिवास देखील जाणून घेऊ या. त्यांच्याकडून आशीर्वाद प्राप्त करू या.

***


## प्रपत्र ४ : अमृतकुंभ द्वैमासिकाविषयीचे निवेदन

१) प्रकाशन स्थळ : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४

२) प्रकाशनाचा अवधी – द्वैमासिक

३) मुद्रकाचे नाव – बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
मुद्रणस्थळाचा पत्ता : परफेक्ट प्रिंटस्, २२, इंडस्ट्रियल इस्टेट, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे (प.) ४००६०१

४) प्रकाशकाचे नाव : बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पू)-४००६०३

५) संपादकाचे नाव : ब्र. कु. सचिन उपाध्ये
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : १०२, सीताराम भुवन, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२ महाराष्ट्र

६) मालकाचे नाव व पत्ता : प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय, माऊंट आबू (राजस्थान)
मी बी. के. गोदावरी, असे प्रमाणित करते की माझ्या ज्ञानानुसार वरील माहिती सत्य आहे

(बी. के. गोदावरी)
प्रकाशिका, अमृतकुंभ

# शिवरात्र – गीताजयंती अन्योन्य संबंध

या अंकातील विविध लेखांद्वारे शिव म्हणजे कोण, शिवरात्रीचे काय प्रयोजन आहे, त्यामागचे आध्यात्मिक रहस्य काय याबाबतचे लेख आपण वाचले असतील. आता थोडेसे गीतेच्या ज्ञानाचा उद्देश काय आणि या दोहोंतील संबंध काय ते टप्प्या-टप्प्याने पाहू.

गीतेचे तत्त्वज्ञान ज्या दिवशी प्रकट झाले त्या दिवसाची आठवण म्हणून दरवर्षीच्या मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल एकादशीला आपण गीताजयंती साजरी करतो. गीतेच्या तत्त्वज्ञानातून मानवाला काय साध्य करायचे असते असे विचारले, तर सोपे उत्तर देता येईल – विकारांपासून मुक्ती प्राप्त करून मन स्थिर करण्याचा विधी शिकणे किंवा त्यालाच राजयोग अभ्यास करणे म्हणता येईल. गीतेतील 'तस्माद्योगी भवार्जुन' ऐकून आपण विचार करू लागतो, योगी कसे बनायचे. योग विषयावर अनेकानेक ग्रंथ आहेत, कुणी म्हणतं मूर्तीवर मन एकाग्र करा, कुणी म्हणतं श्वासांवर ध्यान द्या असे अनेक विधी असतील.

योग शब्द युज् या धातूपासून आला आहे आणि त्याच अर्थ- जोडणे. काय जोडायचे तर मन-बुद्धी. कुणावर? तर परमेश्वरावर. साध्या सोप्या शब्दात सांगायचे झाले, तर आठवण करणे म्हणजे योग साधणे किंवा गहिऱ्या आठवणीला राजयोग म्हटले तरी हरकत नाही. कुणाचीही आठवण यावी याकरिता चार प्रमुख गोष्टी असाव्या लागतात. १) परिचय – याविना आठवण करणे अशक्यच आहे. २) परिचयानंतर संबंध – एखाद्या कुमारिकेचे लग्न ठरते तेव्हा भविष्यातील संबंध जुळणार या थोडक्या परिचयानेही आठवण वारंवार येऊ लागते. संबंध जुळू लागतात. ३) स्नेह – संबंधांचा कालावधी जितका मोठा तितका स्नेहबंध दृढ व्हायला मदत मिळते. आणि ४) प्राप्ती – एखाद्याकडून आपल्याला काही प्राप्त होत असेल तर त्याची आठवण स्वाभाविकपणे येते. लौकिक संबंधात एकतर स्वार्थावर आधारित आठवण येते किंवा एखाद्याची वैशिष्ट्ये / गुण आठवून स्मृती येते. नाही तर कुणी परोपकार केले असतील तर आठवण येते.

याच धर्तीवर शिव परमात्म्याचा परिचय सुरुवातीलाच (संपादकीयमध्ये) आला आहे. द्विरुक्ती टाळण्याकरिता येथे दिला नाहीय. जोपर्यंत यथार्थ परिचय नाही तोवर यथार्थ आठवणही करू शकत नाही. एरव्ही आपण म्हणतो 'त्वमेव माता च पिता त्वमेव'. ते भावनेच्या पातळीवर आणणे आणि त्या संबंधांचा जाणीवपूर्वक अभ्यास करणे, हा साधनेचा खरा पाया आहे. आपल्या कुवतीनुसार आजवर आपण परमेश्वराला जाणण्याचा प्रयत्न केला. शास्त्राधार / ग्रंथाधार घेतला, गुरु इत्यादींचे मार्गदर्शनही अनेकांनी घेतले. पण यथार्थ परिचय मिळाला नाही म्हणून यथार्थ योग साधता आला नाही. आता तो स्वतः येऊन आपला सत्य परिचय देत आहे, त्याद्वारे त्याच्याशी योग साधणे शक्य आहे. मात्र परमेश्वर म्हणतो माझी आठवण स्वार्थपोटी किंवा फलाकांक्षेने करू नका. त्याच्या गुणांच्या स्मरणात राहणे, त्याच्या शक्तींच्या स्मरणात राहणे म्हणजे योग आहे.

भक्तीमार्गातही आपण आठवण करतोच की पण कुणाची? कुठल्या ना कुठल्या इष्ट देव-देवतेची. म्हणजेच दिव्य गुणधारी, दिव्य शरीरधारीचीच. आजवर आपण कीर्तन-भजन गात आलो आहोत. नामजपही साधनेचाच एक प्रकार आहे. पण त्याद्वारे आपले मन-बुद्धी किती एकाग्र होते असा आपणच आपल्याला प्रश्न केला तर उत्तर येते – अत्यल्प. याचे काय कारण आहे? कारण आपण यथार्थ विधी अनुसरत नाही. या विविध साधनेच्या प्रयत्नात आपण देहाच्या भानापासून दूर जाण्याचे प्रयत्न करत नाही त्यामुळे मन-बुद्धी भटकण्यास वाव राहतो.

शिव परमात्मा यथार्थ विधी सांगतात, प्रथम तुम्ही स्वतःच्या देहाला विसरा आणि आत्म-स्वरूपात स्थित व्हा. त्यानंतर निराकार शिवाच्या गुणरूपाचे चिंतन करा किंवा त्याच्या शक्तींची जाणीव घेण्याचा प्रयत्न म्हणजे त्याच्याशी योग साधणे. ज्याप्रमाणे घराच्या विजेच्या तारेची जोडणी खांबावरच्या मोठ्या तारेशी करायची असेल तर दोन्ही वायरींचे वरचे आवरण काढावे लागते. त्याप्रमाणे

परमेश्वर तर निराकार रूपातच आहे. त्याला देह नाही म्हणजे देहभानरूपी रबरी आवरण नाही आणि आपल्याला मात्र देह आहे. त्या देहाचे भान म्हणजे रबरी आवरण विसरणे गरजेचे आहे. आत्मभानात स्थिर झाल्याशिवाय जोडणी शक्य नाही आणि त्याविना सर्वशक्तिमानाकडे असलेल्या शक्तीचा आपल्यात उदय होणे अशक्य आहे. पाच हजार वर्षांपूर्वीचा प्राचीन असा हाच खरा राजयोग होय.

आता प्रचलित उपासना पद्धतींशी हा विधी ताडून पाहू या. अनेकदा भक्तीत 'मागणे' असते निष्काम भक्ती क्वचितच कुणी करत असेल. सर्व विधी बारकाईने पाहिले तर ते कुठे ना कुठे देह जाणिवेशी निगडित आहे. उदाहरणार्थ श्वासावर मन एकाग्र करणे असो किंवा जप, कीर्तन इत्यादी विधी असो. एखाद्या मूर्तीची पूजा करणे ज्याला आपण सगुण उपासना म्हणतो त्यातही भौतिक रूपावरच मन एकाग्र करण्याचा प्रयत्न असतो. याऐवजी वर उल्लेखिलेला विधी अभ्यास केल्यास आपल्यातील विकार हळूहळू ढीले पडू लागल्याचा अनुभव येऊ लागतो. अशा राजयोगाच्या निरंतर अभ्यासाने दैवी गुण धारण करणे साकार होऊ लागते. सध्याचा मानव विकाराधीन आहे. तिथपासून निर्विकारी स्थितीकडे प्रवास सुरू होतो. निर्विकारी आणि सर्वगुणसंपन्न अवस्था म्हणजेच साक्षात् श्रीकृष्णाची स्थिती. राजयोग साधनेचे उद्दिष्टच नराचा नारायण बनणे आहे. मानवाचे एकेकाळचे रूप, देवरूप होते. पुन्हा तसे बनायचे आहे हेच या जीवनाचे उद्दिष्ट आहे. श्रीकृष्णासमान पूज्य बनायचे आहे, केवळ त्याच्या मूर्तींच्या पूजेत समाधानी व्हायचे नाही. त्याच्यासमान बनण्याची आध्यात्मिक आस बाळगायची आहे. हाच सोऽहम् चा खरा मंत्र आहे, सोऽहम् म्हणजे मी आणि परमात्मा एकच आहे असे नव्हे. आत्मा आणि परमात्म्याचे रूप ज्योतिर्बिन्दूच आहे जसे डोळ्याला आकाशातली चांदणी दिसावी; पण गुणांच्या बाबतीत आत्मा प्रेमस्वरूप, सुखस्वरूप इत्यादी आणि परमात्मा मात्र गुणांचा सिंधू आहे. म्हणूनच त्याचा महिमा-प्रेमाचा सागर, शक्तीचा सागर... आहे. आपण मनुष्यात्मे जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात येतो आणि शिव परमात्मा या चक्रापासून अलिप्त आहे हा सगळ्यात मोठा भेद आहे. मनुष्यात्मा ते देवात्मा या आध्यात्मिक प्रवासासाठी शिव परमात्मा स्वतः येऊन केवळ ज्ञानच नाही, तर शक्तीदेखील देतात. आता विचार करून पहा अव्यक्तं व्यक्तिमापन्नं... किंवा मी अजन्मा आहे हे जो जाणतो तो मुक्त होतो, वा देह आणि देहाचे धर्म विसरून माझेच स्मरण कर अशी महावाक्ये फक्त एक निराकारच म्हणू शकतो. ज्याला स्वतःचा देह आहे तो कसे काय म्हणू शकेल, देहभानाचा त्याग कर आणि माझे स्मरण कर. कुठलीही देहधारी व्यक्ती वा देवता असे ज्ञान देऊ शकत नाही हेच यावरून उमजते.

कलियुगाच्या अंती शिव परमात्मा अवतरित होतात तीच महाशिवरात्रीची घटिका आणि अवतरित होताच त्यांनी ज्ञान प्रदान आरंभ करणे म्हणजे गीताजयंती. या अर्थी शिवरात्री आणि गीताजयंती एक म्हणता येतील. अशी शिवरात्र मानवाला देवत्व प्रदान करणारी आहे म्हणून तिला हिरेतुल्य म्हटले तर ते उचितच ठरेल. या सखोल विषयाच्या अधिक अभ्यासासाठी ब्रह्माकुमारीजच्या जवळच्या सेवा-केंद्रावर जाऊन उदंड लाभ घ्या हीच कळकळीची विनंती.

***

---

(पृष्ठ क्र.१० वरुन)

दक्षिण भारतात माघ महिन्यातील कृ.१३ ही तिथी म्हणजे उत्तर भारतातील फाल्गुन महिन्यात येणारी महाशिवरात्र. तिथीतील हा फारक पंचांगातील कालगणनेच्या पद्धतीमुळे उद्भवतो एवढेच. महाशिवरात्रीच्या वेळी परमात्मा शिव अवतरित झाले अशी समजूत आहे. ही केवळ स्थूल दिवस-रात्रीची कथा आहे, की यात काही विशेष आध्यात्मिक अर्थ आहे? ही रात्र आहे अज्ञानाची रात्र. स्वतःच्या आत्मिक रूपाचा यथार्थ परिचय नसल्यामुळे मनुष्य काम-क्रोध-लोभ-मोह-अहंकार या पाच विकारांच्या प्रभावाखाली कर्म करत आहे. या विकारवश केलेल्या कर्मांमुळे दुःख प्राप्त होत आहे आणि या दुःख चक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. अशा अज्ञानरूपी अंधकारात चाचपडत असलेल्या मनुष्यात्म्यांना सत्य ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले आहे. स्थूल ज्योतिर्लिंगाच्या रूपात ज्याची मनोभावे पूजा केली, त्याच भक्तीचे फलित म्हणून परमात्मा शिव दिव्य ज्ञान आणि सुख, शांती, पवित्रतेचे दान देत आहे. परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे स्मरण हाच दुःखमुक्तीचा मार्ग आहे.

***



## त्रिमूर्ती शिव

सुखकर्ता - दुःखहर्ता ईश्वराने सृष्टीची निर्मिती केली, असे म्हणतात. सृष्टीची आजची अवस्था पाहता सुखकर्ता ईश्वराने अशी दुःखकारक किंवा तमोगुणी सृष्टी रचली असेल काय? नक्कीच नाही! मानवाला जीवनात कर्तव्ये बजावावी लागतात त्याचप्रमाणे ईश्वराचीही काही कर्तव्ये आहेत. ईश्वर नवसृष्टीची रचना करतो किंवा स्थापना करतो, जीर्ण सृष्टीचे परिवर्तन घडवतो आणि नव सृष्टीचे पालन-पोषणही करतो. तीन देवतांच्या द्वारे हे कर्तव्य बजावतो म्हणूनच त्यास त्रिमूर्ती शिव म्हणतात. इंग्रजीत परमेश्वरास गॉड म्हणतात. **G** = जनरेशन (सर्जन) **O** = ऑपरेशन (पालनपोषण,) **D** = डिस्ट्रक्शन (विनाश किंवा विसर्जन). या तीन कर्तव्यांमुळे गॉड हे नावही सार्थ ठरते.

Registration No.MAH/MAR/2007/21914



## तमसो मा ज्योतिर्गमय

सध्याच्या विज्ञानयुगातही अंधार तो कोणता? अज्ञानरूपी अंधकार किंवा जीवनातील आव्हाने म्हणजे अंधार. लहान मुलापासून ते वृद्धांपर्यंत बहुतेकांना कुठल्या ना कुठल्या प्रकारचा ताण - तणाव आहे. खेळाडू आणि विद्यार्थ्यांमध्ये चढा-ओढीचे विकृत रूप वाढत आहे. व्यवसायिक जगतात जीवघेण्या स्पर्धेमुळे निराशा-तणावाशी पदोपदी सामना आहे. पारस्परिक संबंधातील गैरसमजुतींमुळे अनेक जण वैफल्यग्रस्त होतात. मोबाईल आणि अनेक पदार्थांचे व्यसन ही एक समस्या आहे. अशा स्वरूपाच्या अंधारावर मात करण्यासाठी सत्य ज्ञानरूपी प्रकाशाची ओळख होणे गरजेचे आहे.

**शिवपित्याने शिकविलेला 'राजयोग' अशा समस्यांवर औषध आहे.**